# आरोग्य सेवा संचालनालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,
मुंबई- ४०० ००१

क्र. आसेसं/डिएचएस पीजी पदविका २०१९/प्रवेशप्रक्रिया/अधिसूचना क्र.१० दि. ०७/११/२०१९

## अधिसूचना

## "आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम - २०१९ समुपदेशन सत्राबाबत"

आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम - २०१९ चे समुपदेशन सत्र आधी ठरलेल्या वेळापत्रकानुसार दि.१४/११/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेले होते.

परंतु काही अपरिहार्य कारणास्तव सदर अभ्यासक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या समपुदेशन सत्राच्या तारखेमध्ये बदल करण्यात येत आहे.

या अधिसूचनेनुसार असे कळविण्यात येते की, आरोग्य सेवा संचालनालय वैद्यकीय पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम-२०१९ चे समुपदेशन सत्र सुधारित वेळापत्रकानुसार दि.१८/११/२०१९ रोजी स. १०.०० वा पासून सभागृह, ३ रा मजला, आरोग्य भवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपाऊंड, सीएसएमटी, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

समुपदेशन सत्राचे वेळापत्रक खालीलप्रमाणेः

| दिनांक | वेळ | प्रक्रिया |
|---|---|---|
| १८/११/२०१९ | स.१०.०० ते स.११.०० | नोंदणी |
| | स.११.०० ते समुपदेशन सत्र समाप्त होईपर्यंत | समुपदेशन सत्र |

समुपदेशन प्रक्रियेसाठी येताना सोबत प्रवेशप्रक्रिया पुस्तिकेमध्ये नमूद आवश्यक सर्व मुळ व छायांकित प्रतीसह व्यक्तीशः उपस्थित रहावे. (प्रवेश पुस्तिका **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे)

सदर समुपदेशन प्रक्रिया खालील प्रमाणे राबविण्यात येईल -

१) उमेदवाराने समुपदेशन फेरीमध्ये निवडलेली जागा यात नंतर कुठलाही बदल होणार नाही. ही जागा निश्चित करण्यासाठी उमेदवारांनी मुळ शैक्षणिक व इतर संबंधित प्रमाणपत्रे विभागाकडे त्याच दिवशी जमा करावयाची आहेत.

२) सदरची फेरी ही अंतिम असल्याने या फेरी नंतर कोणताही बदल करता येणार नाही.

सही/-
संचालक,
आरोग्य सेवा, मुंबई.